## महत्त्वाचे

### ग्रामसुधारणेसाठी तुकडोजी महाराजांचे विचार प्रेरणादायक : बाविस्कर

**नाशिक ।** महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वरांपासून ते गाडगेबाबांपर्यंत अनेक संत झालेत. याच परंपरेतील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी




जनसेवेचा ध्यास घेत माणूस सुधारला तर गाव सुधारेल, गाव सुधारले तर पर्यायाने देशाचा विकास होईल, अशा प्रेरणेतून समाजप्रबोधन केले. म्हणूनच ग्रामसुधारणेसाठी आजच्या काळातही राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे विचार प्रेरणादायक आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार मुकुंद बाविस्कर यांनी केले. गिरणा गौरव प्रतिष्ठानच्या वतीने हुतात्मा स्मारकात आयोजित 'पुस्तकावर बोलू काही' उपक्रमात 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज' या पुस्तकावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक तु.सी.ढिकले होते. श्री.बाविस्कर पुढे म्हणाले की, आधुनिक विचारांचे राष्ट्रसंत असणाऱ्या तुकडोजी महाराजांना 'राष्ट्रसंत' ही पदवी भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी दिली. ग्रामगीतासारखा अनमोल ग्रंथ लिहून त्यांनी ग्रामविकासाचा मार्ग दाखविला. भारत सरकारने त्यांचा केलेला गौरव, महाराष्ट्र शासनाने तुकडोजी महाराज यांच्या नावाने सुरू केलेले ग्रामस्वच्छता अभियान स्पर्धा, नागपूरच्या विद्यापीठाला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे दिलेले नाव, महाराजांनी स्थापन केलेले गुरुदेव सेवा मंडळ आणि अमरावती नाजीक मोझरी येथे उभारलेला गुरुकुंज आश्रम अशा विविध घडामोडींचा सविस्तर आढावा या पुस्तकात घेतला आहे, असेही त्यांनी सांगितले. प्रारंभी काश्मिरमधील दुर्घटनेत मृत पावलेल्या व्यक्तींना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. योगिनी खरे आणि माणिकराव गोडसे यांना ग्रंथभेट देऊन सन्मानित करण्यात आले. मधुकर गिरी यांनी सूत्रसंचालन तर माणिकराव गोडसे यांनी आभार मानले. दरम्यान येत्या मंगळवारी (दि.२९) निशांत गुरू हे 'वाघिणीचे दूध' या पुस्तकावर ऐसपैस गप्पा करणार आहे.

### ग्रंथ हे उत्तम मार्गदर्शक : प्राचार्य डॉ. ढगे

**निफाड ।** ग्रंथ हे ज्ञान माहिती देत असतात. ग्रंथातूनच प्रेरणा मिळत असते. विविध आत्मचरित्र, चरित्र, ऐतिहासिक ग्रंथ, विज्ञान विषय ग्रंथ, माहिती



तंत्रज्ञान या सगळ्यांच ज्ञान ग्रंथरूपाने आपल्याला वाचायला मिळते. आयुष्याला दिशा मिळण्यासाठी ग्रंथ हे एका मार्गदर्शकासारखे काम करीत असतात. म्हणून प्रत्येकाने नियमित वाचन केलं पाहिजे, असे मत प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे यांनी व्यक्त केले. मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या कर्मवीर गणपत दादा मोरे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात ग्रंथालय शास्त्र विभागातर्फे आयोजित जागतिक पुस्तक दिन समारंभ प्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रा. डॉ. प्रवीण ढेपले, ग्रंथालय विभाग प्रमुख प्रा. दिपाली शेंडे, राजेंद्र मत्सागर आदी उपस्थित होते. डॉ. ढगे पुढे म्हणाले की, यावर्षीचा जागतिक ग्रंथ दिनाचा विषय 'रीड युवर वे' म्हणजेच आवडेल ते वाचा याविषयी माहिती देताना विद्यार्थ्यांनी प्रथमतः वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी वर्तमानपत्रातील छोट्या, मोठ्या बातम्या वाचायला सुरुवात करा. विषय तज्ञ संपादकीय लेख वाचा. मोबाईलच्या डिजिटल युगात वाचन संस्कृती टिकवून ठेवण्याचे सामर्थ्य विद्यार्थ्यांमध्येच निश्चित आहेच. फक्त वाचनाकडे एक पाऊल टाकण्याची कृती व मानसिक तयारी सर्वांनी या निमित्ताने करावी आणि ग्रंथालयीन पुस्तकांचा जास्तीत जास्त उपयोग करावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. याप्रसंगी महाविद्यालय ग्रंथालयात संदर्भ व क्रमिक पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल शेंडे यांनी केले. आभार राजेंद्र मत्सागर यांनी मानले. यावेळी डॉ. प्रवीण ढेपले, प्रा. बी.बी. मुंतोडे, प्रा. श्रद्धा गवळी, डॉ. महेश बनकर, एस. डी. गायकवाड सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

### देवळालीत दहशतवादी हल्ल्याचा निषेध

**देवळाली कॅम्प ।** येथील सिंधू सेवा मंडळाच्या सर्वपक्षीय नेत्यांनी जुन्या बसस्थानक येथे एकत्र येऊन झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध व्यक्त केला. पाकिस्तानचा झेंडा जाळून निषेध करण्यात आला. यावेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस सचिन ठक्कर, बाळू बडगुजर, अभिजित धिवरे, भगवान कटारिया, प्रसाद आडके, तानाजी करंजकर, शरद काळे, तानाजी ढगे, जीवन गायकवाड, विलास जाधव, भारत बळवाणी, आमोद शरणे, नितीन भागीला आदींसह विविध पक्षांचे कार्यकर्ते उपस्थित होते. "भारत माता की जय", "वंदे मातरम्", "आतंकवादाचा नाश होवो" अशा घोषणा देत वातावरण भारून गेले होते.

# श्रीक्षेत्र संत निवृत्तीनाथ महाराज समाधी परिसर हागणदारीमुक्त कधी होणार?

## संस्थान, त्र्यंबकेश्वर न.पा.चे अक्षम्य दुर्लक्ष?



**इगतपुरी ।** वारकरी संप्रदायाचे उगमस्थान असलेल्या संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज समाधी परिसर व सगतच्या ब्रम्हगिरीच्या पायथ्याला हागणदरीने वेढा दिलेला आहे.परिसरात यामुळे दुर्गंधी व घाणीचा प्रादुर्भाव होत असून यामुळे भाविकाचें आरोग्य धोक्यात आहे. दुर्दैवाने स्वच्छतेच्या या गंभीर प्रश्नाकडे ना संस्थान विश्वस्ताचे लक्ष आहे, ना त्र्यंबकेश्वर नगरपालिकेचे लक्ष आहे.

भारतातील बारा महान ज्योतिर्लिंगापैकी एक महत्त्वाचे त्रंबकराज ज्योतिर्लिंग, संपुर्ण भारतात शांतीसाठीचा नागबली विधी व वारकरी संप्रदायाचे उगमस्थान संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज समाधीस्थान आदी महात्म्य या क्षेत्राचे आहे. वारकरी संप्रदायाचे हे अत्यंत श्रद्धेचे ठिकाण असुन येथे सातत्याने शेकडो भाविकाचीं ये जा सुरु असते. सतत किर्तन सोहळे व धार्मिक कार्यानें संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ समाधी परिसर भाविकानीं गजबजलेला असतो.मात्र एवढी वर्दळ सातत्याने असतानांही आजही या ठिकाणी सार्वजनिक स्वच्छतागृहाची वानवा आहे.ये जा करणाऱ्या भाविकानां नैसर्गिक विधीसाठी चक्क परिसरात उघडयावर जावे लागते हे दुर्दैवी आहे.यामुळे ब्रम्हगिरीचा पायथाही घाणीने बरबटलेला आहे. त्र्यंबकेश्वर नगरपालिका प्रशासन व समाधी देवस्थान संस्थान विश्वस्त,पुजारी महंत हे सगळं उघडया डोळयानीं पहात असतात.या जबाबदार संस्था तथा व्यक्तींना भाविकाच्यां आरोग्याबातही यत्किंचितही काहि वाटु नये याबाबत भाविक आश्चर्य व्यक्त करत आहे. या परिसरात घाणीने एवढे साम्राज्य पसरवले आहे की यामुळे समाधी परिसरही अस्वच्छ झाला आहे. परिसरात यामुळे मच्छर व डासांचे थैमान असुन रात्री या परिसरात थांबणे अवघड आहे. संतश्रेष्ठ निवृतीनाथ महाराज समाधी मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम सध्या सुरु आहे. मात्र ते ही अत्यंत संथगतीने सुरु असल्याबाबद भाविक नाराजी व्यक्त करत आहेत.

### सगळयांना संधी, भाविकांचे काय?

संतश्रेष्ठ निवृतीनाथ महाराज समाधी मंदिरावर शासन नियुक्त विश्वस्त समिती काम पाहते. या समितीवर राजकिय लागेबांधे असलेलीच मंडळी कारभारी असुन, सगळ्यांना अध्यक्ष, उपाध्यक्ष व पदाधिकारी पदाची हाव असुन यासाठी सगळया विश्वस्तानीं वर्ष दोन वर्ष संधी प्रत्येकास देण्याची राजकिय मंडळी करतात तशी सोय करुन घेतली आहे. यामुळे देवस्थानही राजकारणापासुन वेगळे न ठेवण्याचे काम या विश्वस्त मंडळीनीं चालवलेय, याबाबत भाविक नाराजी व्यक्त करत आहे.

# सप्तश्रृंग गडावर देवीच्या दर्शनाला येणारे भाविक धुळीमुळे हैराण

## सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांची डोळेझाक। एक महिन्यापासून रस्त्याचे काम बंद

**सप्तश्रृंग गड ।** लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या सप्तशृंगगडावरील धोंड्या कोंड्या विहरीजवळी व ग्रामपंचायत टोल नाक्याजवळील रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर माती असल्याने धूळ उडून वाहनचालकांच्या डोळ्यात जात आहे. आता तर कडक ऊन पडल्यामुळे रस्ता कोरडा झाला असून रस्त्यावरील खडी बाहेर आली आहे. वाहन त्यावरून गेले की धुळ मोठ्या प्रमाणात उडत आहे. यामुळे दुचाकी धारकांना पुढच्या मोठ्या गाडीच्या मागे वाहन चालवताना धुळीचा मारा सहन करत आपले वाहन चालवावे लागत आहे.

रस्त्यावरील मातीमुळे प्रचंड प्रमाणात धूळ उडत असल्याने दुचाकीधारकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तसेच धुळीमुळे समोरील वाहन दिसत नसल्याने दुचाकीस्वारांमध्ये अपघाताच्या घटनाही घडत असून, ज्याठिकाणी मातीचे ढीग आहेत तेथील स्वच्छता करून या मातीच्या रस्त्यावर पाणी शिंपडण्याची मागणी वाहनधारकांकडून होत आहे.

सप्तशृंगगडावर रोज हजारो भाविक दर्शनासाठी येत असतात. दिवसभर गडावर वाहनांची वर्दळ राहत असल्याने उडणारी धूळ दुचाकी वाहनधारकांच्या घशात जात आहे या धुळीमुळे रस्त्यावरून नियमित ये-जा करणाऱ्यांना खोकला, त्वचारोग आदींना सामोरे जावे लागत आहे. रस्त्यावर असणारी माती उचलावी किंवा रस्त्यावर पाणी मारावे, अशी मागणी त्रस्त वाहनधारक व नागरिक यांचेकडून करण्यात येत आहे.





### धुळीमळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

धुळीमुळे होत असलेल्या त्रासामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न वाढला आहे. दवाखान्यात रुग्णांचे प्रमाणही वाढले आहे. धूळ श्वासावाटे शरीरात जाते. धुलीकरण श्वसनात जमा होतात. अँलर्जीचा त्रास होणाऱ्यांना सर्दी, खोकला, कफ होणे, धाप लागणे असे त्रास होतात, तर सर्वसामान्यांना सर्दी, खोकला आणि घशात दुखणे, असे त्रास होत आहेत. या धुलीकरणाचा दीर्घकालीन परिणाम म्हणजे श्वसनाची क्षमता कमी होत आहे. प्रचंड धुळीमुळे श्वसनाचे विकार वाढीस लागले आहेत. हवेतील धुळीचे प्रमाण सरासरीपेक्षा वाढल्याने सर्दी खोकल्यापासून दम्यापर्यंत अनेक तक्रारी वाढत आहेत. संबंधित विभागाला केंव्हा जाग येणार आहे हे येणारा काळच सांगेल.

> सप्तश्रृंगी गड येथील धोंड्या कोंड्या व टोलनाका जवळील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धूळ उडत आहे, ज्यामुळे वाहनचालक आणि नागरिक हैराण आहेत. खराब रस्त्यांमुळे धूळ उडण्याचे प्रमाण वाढले आहे आणि त्यामुळे श्वसनाच्या समस्या वाढू शकतात. धुळीमुळे श्वसनाचे आजार, डोळ्यांना त्रास, आणि त्वचेच्या समस्या होऊ शकतात, विशेषतः लहान मुले आणि वृद्ध व्यक्तींना. श्वसनाचे गंभीर आजार होऊ शकतात. खराब रस्त्यांमुळे धूळ उडण्याचे प्रमाण वाढले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने जलद गतीने रस्त्यांची दुरुस्ती करण्याची गरज आहे. रस्त्यावर पाणी मारणे, झाडू मारणे, किंवा इतर उपाययोजना करणे आवश्यक आहे. काही ठिकाणी रस्ता सिमेंट काँक्रिटीकरण कामामुळे पर्यायी मार्गावर धूळ उडत आहे, ज्यामुळे नागरिकांना त्रास होत आहे. रस्त्यावर धुळ कमी करण्यासाठी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे.
>
> **- विवेक बेणके, राष्ट्रवादी युवक शहर उपाध्यक्ष, सप्तशृंगी गड**

# "माझी प्रारतना" या मराठी चित्रपटातील पहिलं मराठी गाणं "तुझ्या प्रेमाची साथ मिळता" प्रदर्शित

**नाशिक ।** प्रेमाच्या रंगांनी सजलेलं एक नवीन रोमँटिक गाणं आता प्रेक्षकांच्या भेटीला आलंय. पद्माराज राजगोपाल नायर लिखित आणि दिग्दर्शित "माझी प्रारतना" ह्या चित्रपटाचं पहिलं गाणं प्रदर्शित झालय. या गाण्यात स्वतः पद्माराज राजगोपाल नायर आणि अनुषा अडेपचा रोमँटिक अंदाज दिसत आहे. दोघं कलाकारांना आपण शेतात रोमांस करत एकमेकांच्या मिठीत हरवलेले पाहू शकतो. यांच्यात हळुवार खुलत जाणाऱ्या प्रेमभावना या गाण्यातून व्यक्त होत आहे. दोघंही या गाण्याच्या माध्यमातून प्रेमाचे धागेदोरे घट्ट बांधताना दिसत आहेत. एकमेकांबद्दलची ओढ या गाण्यातून दिसत आहे. गायकांनी गाण्यात अतिशय उत्तम प्रकारे सादरीकरण केले आहे. हे एक अप्रतिम लव्ह साँग आहे जे संगीत प्रेमींन नक्कीच आवडेल. विश्वजित सी टी ह्यांनी या गाण्याला संगीत दिलय, तर सुप्रसिद्ध गायिका के. एस. चित्रा ह्यांनी आपला आवाज दिलाय. तर गाण्याचे बोल हे पद्माराज राजगोपाल नायर ह्यांनी लिहिले आहेत.

विशेष म्हणजे सुप्रसिद्ध भारतीय गायिका के. एस. चित्रा, ज्यांना "नाइटिंगेल ऑफ साऊथ इंडिया" म्हणून ओळखलं जातं, यांनी आपली मराठी गाण्याची कारकीर्द सुरू केली ती या चित्रपटातील गाण्याद्वारे. याच गाण्याद्वारे त्यांनी मराठी संगीतविश्वात एक भावनिक आणि सुंदर पाऊल टाकलं.

गायिका के.एस. चित्रा ह्यांनी याबद्दल आपलं मत व्यक्त करत सांगितलं "माझ्यासाठी ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे की मी या मराठी चित्रपटासाठी गाणी गायली आहेत. मराठी ही माझी नेहमीची भाषा नसल्यामुळे यात गायन करणं माझ्यासाठी एक आव्हान होतं, पण श्री पद्माराज राजगोपाल नायर यांनी उच्चार आणि शब्दोच्चार यात फार मोलाची मदत केली. आणि त्या भावनेला अंत:करणातून अनुभवून मी गाणं उत्तम प्रकारे सादर करू शकले. मला मराठी मध्ये एक सुंदर गाणं गाण्याची इच्छा



होती आणि या चित्रपटाद्वारे मला तीन गाणी गायचं सौभाग्य लाभलं. 'तुझ्या प्रेमाची साथ मिळता', 'तूच माझी मूळ' आणि 'सांगायचं आहे' (विठ्ठला) ही गाणी श्री पद्माराज राजगोपाल नायर यांनी लिहिलेली असून, संगीत दिग्दर्शन श्री विश्वजीत सी टी यांचं आहे. विश्वजीतजी हे अतिशय उत्तम संगीतकार आहेत आणि त्यांच्यासोबत मी अनेक वेळा काम केले आहे आणि प्रत्येक वेळा मला त्यांच्या सोबत काम करून आनंद मिळतो. खरं प्रेम ते आहे ज्यामध्ये स्वत:च्या सुखापेक्षा समोरील व्यक्तीच्या सुखाचा सर्वात जास्त विचार केला जातो. अशीच प्रेमाची एक नवी कहाणी या चित्रपटाच्या माध्यमातून आपल्याला पहायला मिळणार आहे. पद्माराज राजगोपाल नायर लिखित आणि दिग्दर्शित हा नवा सिनेमा महाराष्ट्राच्या अगदी ग्रामीण भागात घडलेली संगीत प्रधान प्रेम कथा आहे.

या चित्रपटात पद्माराज राजगोपाल नायर आणि अनुषा अडेप हे कलाकार मुख्य भूमिकेत आहेत. मराठी सिनेश्रुष्टीतील आणखी काही उत्कृष्ट कलाकार आपल्याला दिसणार आहेत. या चित्रपटाचं लेखन आणि दिग्दर्शन पद्माराज राजगोपाल नायर ह्यांनी केलं आहे, पद्माराज नायर फिल्म्स ह्यांची निर्मिती आहे तर विश्वजित सी टी ह्यांनी संगीत दिलंय. हा सिनेमा ९ मे २०२५ पासून प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यासाठी सज्ज आहे.

# डिप्रेशन : भारतातील एक निमूट वाढणारा आजार

आजच्या धावपळीच्या युगात डिप्रेशन (नैराश्य) म्हणजे एक मानसिक आरोग्याचा विकार आहे ज्यामध्ये व्यक्तीला सतत दुःख, निराशा, रिकामेपणा किंवा आत्मगौरवाचा अभाव जाणवतो. या अवस्थेमुळे तिच्या विचारसरणी, भावना, वागणूक आणि दैनंदिन कामकाजावर गंभीर परिणाम होतो. डिप्रेशन ही केवळ तात्पुरती दुःखद भावना नसून, ती दीर्घकाळ टिकणारी आणि वैद्यकीय उपचाराची गरज असलेली स्थिती आहे." हा एक शांतपणे वाढणारा आजार बनला आहे. जरी जनजागृती वाढत असली तरी, अजूनही अनेकजण मानसिक आरोग्याच्या समस्यांना स्वीकारण्यास घाबरतात.

**DSM-5 नुसार डिप्रेशनची लक्षणे**

पुढीलपैकी पाच किंवा अधिक लक्षणे जर दोन आठवड्यांपेक्षा अधिक काळ टिकून राहिली, तर डिप्रेशनचे निदान होऊ शकते. सातत्याने दुःखी किंवा निराश वाटणे, नेहमीच्या आनंददायक गोष्टींमध्ये रस न वाटणे, वजनात लक्षणीय वाढ किंवा घट; भूक कमी होणे किंवा वाढणे, झोप न लागणे किंवा खूप झोप येणे, सतत थकवा किंवा ऊर्जा कमी होणे, निरर्थकपणा किंवा अपराधीपणाची भावना, विचार करण्याची किंवा निर्णय घेण्याची अडचण, मृत्यू किंवा आत्महत्येचे विचार ही लक्षणे वैयक्तिक, सामाजिक किंवा व्यावसायिक जीवनात अडथळा निर्माण करतात.

**भारतामध्ये डिप्रेशनचे प्रमाण**

जागतिक आरोग्य संघटनेनुसार भारतात सुमारे ५६ दशलक्ष लोक डिप्रेशनने ग्रस्त आहेत. तरीही, समाजातील कलंक आणि अज्ञानामुळे अनेकजण उपचार घेण्यास टाळाटाळ करतात. शहरीकरण, नोकरीचा ताण, सामाजिक एकटेपणा आणि वैयक्तिक संकटे यामुळे सर्व वयोगटांत अगदी किशोरवयीन मुलांपासून ते



वृद्धांपर्यंत डिप्रेशनचे प्रमाण वाढत आहे.

**उपचार : समुपदेशन आणि औषधांचा प्रभाव**

सर्वात महत्त्वाचे म्हणजे डिप्रेशनचे उपचार शक्य आहेत. समुपदेशन आणि औषधोपचार यांचा संगम हा सर्वात प्रभावी उपाय ठरतो. समुपदेशन (जसे की Cognitive Behavioral Therapy - CBT) विचारांचे सकारात्मक पुनर्गठन करून समस्यांशी सामना करण्यास मदत करते. औषधोपचार, मानसिक आरोग्य तज्ज्ञाच्या सल्ल्याने घेतलेले, मेंदूतील रासायनिक समतोल सुधारून लक्षणांवर नियंत्रण ठेवतात. हळुवार स्वरूपात केवळ समुपदेशन पुरेसे ठरू शकते, परंतु मध्यम ते गंभीर प्रकरणांमध्ये औषधांची जोड दिली जाते.

**मदत घेणे का आवश्यक आहे?**

मानसिक आरोग्य हे शारीरिक आरोग्याइतकेच महत्त्वाचे आहे. लक्षणे ओळखून वेळेवर मदत घेणे आत्महत्या टाळण्यासाठी देखील आवश्यक ठरते. विश्वासू व्यक्तींशी बोलणे, समुपदेशकाशी संपर्क साधणे किंवा गटचर्चांमध्ये सहभागी होणे उपयोगी ठरते. मदत मागण्यात लाज नाही उलट, तीच खरी ताकद आहे.प्रसिद्ध व्यक्ती आणि प्रेरणादायी कथा काही प्रसिद्ध व्यक्तींनी डिप्रेशनशी लढा दिला आणि जगासमोर आपली कहाणी मांडली. दीपिका पदुकोण यांनी "Live Love Laugh Foundation" सुरू करून मानसिक आरोग्यासाठी कार्य सुरू केले. रवींद्र जडेजा, भारतीय क्रिकेटपटू, यांनीही मानसिक संघर्षांबद्दल मोकळेपणाने सांगितले. हॅरी पॉटरच्या लेखिका जे. के. रोलिंग, अभिनेत्री लेडी गागा, एलन डीजेनेरेस आणि ड्वेन "द रॉक" जॉन्सन हे सर्व डिप्रेशनवर मात करून यशस्वी झाले. या साऱ्यांच्या कथा सांगतात की डिप्रेशनवर मात करता येते. गरज आहे ती फक्त पहिल्या पायरीची "मदत मागण्याची."

डिप्रेशन कोणालाही होऊ शकतो, पण त्यावर उपचारही तितकेच प्रभावी आहेत. चला, मानसिक आरोग्यावर खुलेपणाने चर्चा करूया, गरजूंसोबत उभे राहूया आणि लक्षात ठेवूया मदत मागणे ही पहिली आणि सर्वात महत्त्वाची पायरी आहे.

**- लेखिका : कीर्ती रणशूर**

## महत्त्वाचे

### कुंभमेळ्यासाठी शिर्डीला होणार दोन हेलिपॅड

**नाशिक ।** नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होऊ घातलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी शासनाच्यावतीने हळुहळू जोर धरला जात आहे. कुंभमेळ्यासाठी भारत वर्षातून हजारो नव्हे तर लाखोंच्या संख्येने नागरिक येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्या दृष्टिकोनातून शासनाने शिर्डी येथे दोन हेलिपॅड उभारण्याचा निर्णय घेतला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यास बैठकीत मान्यता दिली आहे. त्याचप्रमाणे शिर्डी येथे आठ वाहनतळही उभारली जाणार आहेत. कुंभमेळ्यासाठी हवाई मार्गे येणाऱ्या पर्यटकांची संख्या ही जास्त राहणार आहे. त्यांना सोयीचे व्हावे यासाठी शिर्डी हे मध्यवर्ती ठिकाण असून, त्या अनुषंगाने शासनाने हेलीपॅडला मंजुरी दिल्याचे सूत्रांनी सांगितले. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकला वाहन तेलाची अद्यबाबत व्यवस्था होणे आवश्यक असून त्या दृष्टीने महापालिकेने आणि शासनाने युद्ध पातळीवर प्रयत्न करावे, अशी मागणी भाविकांसह साधुसंतांकडून केली जात आहे. शासनाने आता कागदी घोडे नाचण्यापेक्षा प्रत्येक कामाला प्रत्यक्षात सुरुवात करणे काळाची गरज असल्याचे आखाडा परिषदेचे प्रवक्ते भक्तीचारणदासजी महाराजयांनी सांगितले.


### भगूरमध्ये दहशतवादी हल्ल्याचा निषेध

**देवळाली कॅम्प ।** स्वातंत्र्यवीर सावरकरांची जन्मभूमी भगूर येथे काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याचा निषेध करण्यासाठी ग्रामस्थ आणि विविध पक्षांच्या नागरिकांनी छत्रपती शिवाजी चौकात एकत्र येत निषेध आंदोलन केले. या घटनेत मृत पावलेल्या भारतीय पर्यटकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. नागरिकांनी 'भारत माता की जय', 'वंदे मातरम', 'पाकिस्तानचा धिक्कार असो," 'पाक मुर्दाबाद' अशा घोषणांनी चौक दणाणून सोडला. यावेळी पाकिस्तानचा तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला. शोकसभेत नागरिकांनी केंद्र शासनाकडे मागणी केली की, या हल्ल्यास जबाबदार असलेल्या अतिरेकी संघटनांवर कठोर कारवाई करावी. या आंदोलनात मधुकर कापसे, सुभाष जाधव, संग्राम गायकवाड, मनोज कुवर, काकासाहेब देशमुख, विक्रम सोनवणे, प्रसाद आडके, विशाल बलकवडे, प्रताप गायकवाड, हनुमंतराव देशमुख, मृत्युंजय कापसे, उत्तम करंजकर, अनाजी कापसे, संजय जाधव, प्रकाश सुराणा, शशिकांत देशमुख, पंडित हरक यांसह असंख्य ग्रामस्थ उपस्थित होते.

### बुद्धगया महाबोधी विहारासाठी शांती मार्च

**नाशिक ।** बिहार येथील बुद्धगया महाबोधी विहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे, या मागणीसाठी शुक्रवारी शांती मार्च काढण्यात आला. शांती मार्चला दुपारी तीन वाजता छत्रपती संभाजी नगर महामार्गावरील नांदूर नाका येथून सुरुवात झाली. हा मार्च पुढे दसक, जेल रोड, बिटको पॉईंट, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा या मार्गावरून डॉ. आंबेडकर पुतळा या ठिकाणी आला. या ठिकाणी शांती मार्च रॅलीचा समारोप झाला. बौद्ध बांधवांसह भारतीय बौद्ध महासभा, बौद्ध भिक्कू महासंघ, समता सैनिक दल, सम्यक विद्यार्थी आंदोलन समिती, परिवर्तन परिवार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार मंच, त्रिमूर्ती रश्मी बुद्ध लेणी विकास संस्था, मातृभूमी प्रबोधन समिती, दिनबंधू वाचनालय व बुद्ध विहार, टागोर नगर बुद्ध विहार, मानवतावादी बहुउद्देशीय संस्था, संविधान सन्मान समिती, वंचित बहुजन आघाडी, रिपब्लिकन पक्षप्रमुखांनी संघटना, बौद्ध महिला मंडळ सहभागी झाले होते.

# धक्कादायक : वणी गडावर विनापरवाना रिसॉर्टचे बांधकाम महसूल अधिकाऱ्याच्या अंगलट






## न्यायप्रविष्ट भूखंडावर रिसॉर्टचे बांधकाम? बांधकामासाठी गैरप्रकार केल्याचा आरोप

**नाशिक ।** वणी गडावरील एका भूखंडावर रिसॉर्ट चे बांधकाम सुरू करणे पुरवठा विभागातील एका नायब तहसीलदाराच्या चांगलेच अंगलट आले आहे. दृष्टिहीनतेचा आणि अज्ञानपणाचा फायदा घेत नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयातील पुरवठा अधिकाऱ्याने भूखंड खरेदीत फसवणूक केल्याची तक्रार वणी गडावरील इंदुबाई बेनके या ८७ वर्षीय वृद्धेने केली आहे. सदर भूखंडा संदर्भात न्यायालयात वाद सुरू असताना महसुली अधिकाऱ्याने रिसॉर्टचे काम सुरू करून न्यायालयाचा अवमान केल्याचा आरोप केला आहे. या बांधकामासाठी शासनाची कुठलीही परवानगी घेतली नसल्याची धक्कादायक माहिती उघडकीस आले आहे त्यामुळे या गंभीर प्रकरणाची जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशी करण्याची मागणी केली जात आहे.

रमेश गायकवाड हे नाशिक जिल्हा पुरवठा विभागात नायब तहसीलदार म्हणून कार्यरत असून त्यांनी आपली पत्नी पूजा गायकवाड यांच्या नावावर वणी गडावरील भूखंड तब्बल १ कोटी ८५ लाख रुपयांना विकत घेतल्याचे समजते. मात्र खरेदीखतावर त्याची किंमत २५ लाख रुपये दाखविण्यात आल्याचा आरोप इंदुबाई बेनके यांच्या मुलांनी केला आहे. रमेश गायकवाड हे काही वर्षांपूर्वी कळवण तालुक्यात पुरवठा अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यावेळी त्यांनी सदरचा भूखंड आपल्या पत्नीच्या नावे खरेदी केला आहे. सदर भूखंड वणी गडावरील इंदुबाई बेनके या ८७ वर्षीय वृद्धेच्या माहेरचा वडिलोपार्जित आहे.या जमिनीत विना मोबदला हक्कसोड करीत सदरचा भूखंड हा खरेदी करण्यात आल्याचा आरोप सदर महिलेने केला आहे. या व्यवहारात आपली फसवणूक झाल्याचा दावाही या वृद्धेने केला असून संबंधित व्यवहाराबाबत नाशिक आणि कळवण न्यायालयात वाद सुरु असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

भूखंडासंदर्भात न्यायालयात वाद उपस्थित असताना गायकवाड यांनी स्थानिक नागरिक आणि महसुली कर्मचाऱ्यांना हाताशी धरत या भूखंडावर रिसॉर्टचे काम सुरू केले असून या कामाला इंदुबाई बेनके यांच्या मुलांनी जोरदार हरकत घेतली




आहे.एवढेच नाही तर पोलीस स्टेशन, प्रांताधिकारी आणि तहसीलदारांकडे देखील तक्रारी करत संबंधित व्यवहार बेकायदेशी असताना गायकवाड यांना बांधकामास मनाई करण्याची मागणी केली आहे. दरम्यान या बांधकामासाठी गायकवाड यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करीत शासनाच्या कुठल्याही विभागाची परवानगी घेतलीच नसल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. शासनाचे सर्वच नियम माहित असताना तहसीलदार दर्जाच्या महसूली अधिकाऱ्याने नियमांचे उल्लंघन करीत विनापरवानगी बांधकाम सुरू केले ही गंभीर बाब असून जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबत दखल घेण्याची मागणी केली जात आहे. सदरचे बांधकाम करण्यासाठी गायकवाड यांनी अनेक बेकायदेशीर उद्योग केल्याचा आरोप संबंधित बेनके बांधवांनी केला आहे.त्यामुळे रमेश गायकवाड यांनी सुरू केलेले बांधकाम त्यांच्या चांगलेच अंगलट आले असून त्यांच्या कुटुंबियांचा तसेच त्यांच्या मालमत्तेची चौकशी करण्याची मागणी केली जात आहे.

> बेनके परिवारांनी केलेले आरोप खोटे आणि तथ्यहीन आहे. आपला व्यवहार कायदेशीर असून बांधकामासाठी लागणाऱ्या आवश्यक सर्व परवानग्या घेतल्या आहेत. बांधकाम देखील कायद्याच्या चौकटीत राहून केले जात आहे.
>
> **- रमेश गायकवाड, पुरवठा अधिकारी, जिल्हा पुरवठा विभाग, नाशिक**

# सिंचन विभागात पैसे घेऊन बदल्या करण्यात येत असल्याचा गंभीर प्रकार

## अधीक्षक भाऊलाल शेळकेंविरुद्ध जलसंपदा मंत्र्यांकडे तक्रार

**नाशिक ।** गेल्या काही दिवसांपासून अनेक गैरप्रकार उघडकीस येत असल्याने नाशिक सिंचन विभागाची संपूर्ण राज्यात जोरदार चर्चा आहे. गेल्या अनेक वर्षांपासून सिंचन विभागात टेंडर राज असून अधिकारी देखील ठेकेदारांच्या रंगात माखलेले दिसतात. अलीकडच्या काळात अनेक अभियंत्यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करत शासनाचे पैसे खाल्ल्याचे उघडकीस आले आहे. इतकेच नाही तर काहींनी गवता सोबत गाळ देखील खाल्ला आहे. हे सर्व प्रकार सुरु असताना अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयातील अधीक्षक भाऊलाल शेळके यांच्या विषयी गंभीर स्वरूपाची तक्रार करण्यात आली असून, बदल्यांसाठी शेळकेंकडून पैशांची मागणी



होत असल्याची तक्रार थेट जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे करण्यात आली आहे.

भाऊलाल शेळके आणि भ्रष्टाचार वाद हे समीकरण सिंचन विभागात नवीन



नाही. २०१२-१३ साली झालेल्या सरळ सेवा भरतीमुळे चर्चेत आलेले शेळके सध्या कर्मचाऱ्यांच्या बदल्यांमुळे वादात सापडले आहेत. गेल्या आठ ते दहा वर्षांपासून शेळके हे लाभक्षेत्र विकास प्राधिकरण या कार्यालयात कार्यरत असून कर्मचाऱ्यांच्या बदल्यांसाठी त्यांच्याकडून मोठ्या रकमेची मागणी केली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी काही जण पुढे सरसावले आहे. गेल्या आठ ते दहा वर्षांपासून एकाच ठिकाणी करत असल्याने त्यांनी मोठ्या प्रमाणात केल्याचेही तक्रारीत म्हटले आहे.

> **सदरच्या तक्रारीत कुठलेही तथ्य नाही. आपल्या विषय गैरसमजातून चौकशी लावण्यात आली होती मात्र आता कुठलीही चौकशी प्रलंबित नाही.**
>
> **- भाऊलाल शेळके, अधीक्षक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण**

अधीक्षक अभियंता यांचे त्यांना पाठबळ असल्याने शेळके यांच्या भ्रष्टाचार त्यांचाही वाटा आहे का? असाही संशय घेतला जात आहे. शेळके यांच्या विषयी बरेच आरोप करण्यात आलेले आहेत. त्यामुळे त्यांच्यावर काय कारवाई होणार याबाबत सिंचन विभागात उत्सुकता लागून आहे.

# मधुकर झेंडे यांचे वृद्धापकाळाने निधन

**नाशिक ।** नाशिकचा संदर्भकोष अशी अभिमानास्पद ओळख प्राप्त केलेले मधुकर झेंडे यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. मृत्यसमयी ते ८८ वर्षांचे होते. नाशिक महानगरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी या नात्याने ते 28 वर्षांपूर्वी महापालिकेतून सेवानिवृत्त झाले; परंतु त्यानंतरही सुमारे १० वर्षे ते मानद अधिकारी म्हणून कार्यरत होते. भूतपूर्व नगरपालिका तसेच १९८२ पासून स्थापित झालेल्या नाशिक महानगरपालिकेच्या अनेक स्थित्यंतरांचे मधुकर झेंडे साक्षीदार होते. १८५ वर्षांपूर्वी स्थापित झालेल्या सार्वजनिक वाचनालय नाशिक या संस्थेच्या प्रगतीमध्ये मधुकर झेंडे यांचा सिंहाचा वाटा आहे. सामान्य कार्यकर्ता ते सावानाचे अध्यक्ष अशी ४० वर्षांची प्रदीर्घ कामगिरी झेंडे यांनी केली. सन २००८ ते २०१२ या कार्यकाळात त्यांनी वाचनालयाचे अध्यक्षपद भूषविले. नाशिकच्या महाकवी कालिदास कलामंदिराच्या स्थापनेमध्ये महत्वपूर्ण भूमिका बजाविणाऱ्या मधुकर झेंडे यांनी अ. भा. मराठी नाट्य परिषद नाशिक शाखेचे अध्यक्षपद देखील भूषविले होते. १०१ वर्षांची अभिमानास्पद वाटचाल करणाऱ्या नाशिक वसंत व्याख्यानमालेचे कार्याध्यक्ष पद देखील झेंडे यांनी भूषविले होते.



भद्रकाली मार्केट परिसरात अत्यंत गरीब परिस्थितीत वाटचाल करणाऱ्या मधुकर झेंडे यांनी लहानपणी मोहन मास्तर तालीम येथे व्यायाम करून शरीर कमावले आणि अनेक कुस्त्यांचे फडदेखील गाजविले. लोकरंजन कलाकेंद्राची स्थापना करून अनेक नाट्य कलावंतांना घडविण्याचे काम केले. लहानपणी विविध मेळयांमध्ये सहभागी होऊन झेंडे यांनी रंगमंच देखील गाजविला. लोकहितवादी मंडळ, कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड यासारख्या असंख्य सामाजिक संस्थांशी झेंडे यांचा निकटचा संबंध होता. आण्णा अशी ओळख असलेल्या मधुकर झेंडे यांनी नाशिकच्या चौकांचा इतिहास हे संदर्भ कोष ठरलेले पुस्तक देखील लिहिले. नाशिकच्या सुमारे 70 वर्षांची वाटचाल मुखोद्गत असलेले मधुकर झेंडे हे नाशिकचा संदर्भकोष म्हणून देखील ओळखले जायचे. लोकशाहीर गजाभाऊ बेणी आणि मित्रमंडळींच्या सहकार्याने मधुकर झेंडे यांनी 1961 साली नाशिकच्या शिवाजी उद्यानामध्ये मास्टर दिनानाथ मंगेशकर यांचा अर्धपुतळा उभारला होता. तेव्हापासून त्यांचे लता मंगेशकर आणि कुटुंबियांशी जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले होते. सुप्रसिद्ध संगीतकार कल्याणजी आनंदजी, बिनाका गीतमालाचे प्रसिद्ध निवेदक अमीन सायानी यांसह अनेक दिग्गजांशी झेंडे यांचे घरोब्याचे संबंध होते. नाशिकच्या सहा कुंभमेळ्यांचे ते साक्षीदार होते. झेंडे यांच्या पश्चात मुलगा राजेंद्र, मुलगी रेखा व रत्ना, जावई प्रकाश पाटील व आल्हाद वाघ, सून, नातू, पणतू असा मोठा परिवार आहे. मधुकर झेंडे यांच्या निधनामुळे समाजातील विविध स्तरातील नागरिकांनी शोक व्यक्त केला आहे.

# पिंपळगाव बसवंतला काश्मीरमधील अतिरेकी हल्ल्याचा निषेध

**पिंपळगाव बसवंत ।** येथील सर्व मुस्लिम बांधवांनी शुक्रवारी (दि.२५) शहरातील जामा मशीद येथे एकत्र येऊन नमाज पठण करून काश्मीरमध्ये झालेल्या, भ्याड हल्ल्याचा काळ्याफिती बांधून जाहीर निषेध केला.

हल्ल्यामध्ये शहीद झालेले भारतीय बांधवांना दोन मिनिटं स्तब्ध उभे राहून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. अतिरेक्यांचा, पाकिस्तानाचा जाहीर निषेध केला. याप्रसंगी मुस्लिम समाज समाजाचे प्रमुख गफार भाई शेख दस्तगीर भाई शेख जाकीर खान पठाण इलियास कादरी इलियास आत्तार इमरान शेख जावेद काझी भाऊद्दीन पटेल दानिश पठाण आरिफ काझी व मुस्लिम समाज बांधव उपस्थित होते. दरम्यान पिंपळगाव बसवंत शहरात अनेक वर्षापासून




हिन्दू-मुस्लिम भाईचारा असून या ठिकाणी कधीच हिन्दू-मुस्लिम वाद झालेला नाही हिन्दू सण असतील तर मुस्लिम बांधव नेहमीच शुभेच्छा देतात तसेच मुस्लिम समाजाचे सण असले तर हिन्दू बांधव शुभेच्छा देतात. ही परंपरा गत अनेक वर्षांपासून चालत आली आहे. हाच धागा पकडून मुस्लिम बांधवांनी काश्मीर हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त करून अतिरेकी, दहशतवादी यांना कोणतीही जात, धर्म नसतो. त्यांच्याकडे मानवता नसते म्हणूनच मुस्लिम समाज या प्रवृत्तीला कधीच थारा देत नाहीत व देणार नाहीत अशा शब्दांत मुस्लिम बांधवांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

# पिंपळगाव बसवंतला आजपासून चार दिवस धार्मिक उत्सव

**पिंपळगाव बसवंत ।** येथील छत्रपती शिवाजी महाराजनगर मध्ये रविवार (ता. २७) पासून सलग चार दिवस धार्मिक उत्सव संपन्न होत असून राष्ट्रसंत जनार्दन स्वामी महाराजांच्या मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा महामण्डलेश्वर स्वामी शिवगिरी महाराज यांच्या हस्ते संपन्न होत आहे. या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संत जनार्दन स्वामी ट्रस्टचे सेवेकरी सचिन देशमाने यांनी दिली.

सलग चार दिवस चालणाऱ्या या धार्मिक सोहळ्यास श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी शिवगिरी महाराज गुरुदेव श्री त्यागी महाराज यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. रविवारी (ता.२७) सायंकाळी पाच वाजता पिंपळगाव बसवंत शहरातून राष्ट्रसंत जनार्दन स्वामी महाराजांच्या मूर्तीची भव्य मिरवणूक संपन्न होणार असून सोमवारी (ता. २८) व मंगळवारी (ता.२९) नऊ ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत छत्रपती शिवाजी महाराजनगर मधील पर्णकुटी येथे पूजा व होम हवन संपन्न होणार आहे. तर बुधवारी (ता.३०) सकाळी साडेआठ वाजता मूर्ती व कलश स्थापना संपन्न होईल आणि सायंकाळी सहा वाजता गुरुदेव श्री त्यागी महाराज यांचे प्रवचन होईल. प्रवचनाची सांगता झाल्यानंतर



महाआरती संपन्न होईल व रात्री आठ वाजता महाप्रसादाचा कार्यक्रम होईल. या संपूर्ण सोहळ्यासाठी सटाणा येथील सुप्रसिद्ध देव मामलेदार बँड पथक मुख्य आकर्षण असेल. तर राष्ट्रसंत जनार्दन स्वामी महाराजांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा महामंडलेश्वर शिवगिरी महाराज यांच्या हस्ते संपन्न होईल. दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज नगरात १९८५ मध्ये श्री हनुमान मंदिराची प्राणप्रतिष्ठा व संत जनार्दन स्वामी कुटीचा लोकार्पण सोहळा संत जनार्दन स्वामी यांच्या हस्ते संपन्न झाला होता. कालांतराने येथे शनी मंदिर, सप्तशृंगी माता मंदिर उभारण्यात आले. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज नगराला धार्मिक स्थळ म्हणून महत्व प्राप्त झाले आहे. शहरातील हजारो भाविक दररोज येथे दर्शनासाठी येतात हनुमान मंदिर देवी मंदिर शनी मंदिर व संत जनार्दन स्वामी कुटीत दररोज पूजा अर्चा आरत होम हवन कार्यक्रम संपन्न होत असतात. राष्ट्रसंत जनार्दन स्वामी महाराजांचे मंदिर लोकसहभागातून नव्याने अतिशय देखण्या स्वरूपात उभारण्यात आले आहे. सलग चार दिवस चालणाऱ्या या धार्मिक सोहळ्यास परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सचिन देशमाने व भक्त मंडळांनी केले आहे.

## महत्त्वाचे


### मीनका रिव्हरडेल गोल्फ कप स्पर्धेत कॅडिंसाठी विशेष स्पर्धांचे आयोजन



**नाशिक ।** मीनका रिव्हरडेल गोल्फ २०२५ च्या स्पर्धांना कालपासून रिव्हरसाईड गोल्फ कोर्स, निफाड, नाशिक येथे सुरुवात झाली आहे. काल लहान मुलांच्या गटाच्या स्पर्धा पार पडल्या. आज गोल्फ या खेळातील कॅडि म्हणजेच (मदतनीस /बॉल बॉय) यांच्यासाठी विशेष स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. नाशिक, नागपूर व मुंबई येथून हे स्पर्धक आले होते. एकूण १८ होल च्या या स्पर्धेत २३ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. यात नाशिकच्या समीर खानने एकूण ६७ स्ट्रोक मध्ये ही स्पर्धा जिंकली तर नागपूरच्या काशीद शेख याने ७३ स्ट्रोक मारून द्वितीय स्थान प्राप्त केले या स्पर्धकांना रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात आले स्पर्धेचे आयोजक व रिव्हर साईड गोल्फ कोर्स चे संचालक विंग कमांडर प्रदीप बागमार यांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. उद्या दिनांक २७ रोजी या स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ व रिव्हरसाईड गोल्फ कोर्स येथील रिसॉर्ट चे उद्घाटन लेफ्टनंट जनरल एन एस सरना कमांडंट स्कूल ऑफ आर्टीलरी देवळाली, नाशिक, विंग कमांडर अरुणकुमार सिंग, अध्यक्ष जी सी एस अँड एम ए आय, नवी दिल्ली. मिनका रिव्हर डेलचे संचालक व पदाधिकारी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. याप्रसंगी रिव्हर साईडचे अध्यक्ष सचिव तथा सर्व पदाधिकारी खेळाडू यांच्या उपस्थितीत होणार आहे.

### 'सजना' चित्रपटाचे सुरेख टायटल साँग प्रेक्षकांच्या भेटीला

**नाशिक ।** भारतीय संगीतप्रेमींना मंत्रमुग्ध करणारा "सजना" चित्रपटाचा टायटल साँग प्रदर्शित करण्यात आला आहे. प्रेमातील हळव्या भावनांना स्पर्श करत, या गीतामध्ये प्रेमातील गोडवा, आठवणी आणि नात्यांमधील निखळपणा



अगदी हृदयस्पर्शी पद्धतीने मांडण्यात आला आहे. गाण्याचं चित्रिकरण देखील अत्यंत नयनरम्य आहे. सुप्रसिद्ध गायक सोनू निगम आणि राजेश्वरी पवार यांच्या भावस्पर्शी आवाजात सजलेले हे गाणं प्रेमाची नाजूक आणि गहिरं भावना व्यक्त करते. या गाण्याला संगीत दिलं आहे ओंकारस्वरूप यांनी, तर गाण्याचे बोल लिहिले आहेत सुहास मुंडे यांनी. "सजना" हे गाणं केवळ एक संगीतकृती नसून, प्रेमाच्या भावना, आठवणी आणि नात्यांची गुंफण उलगडणारं एक सुंदर चित्रण आहे. गाण्याला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. 'सजना' ग्रामीण महाराष्ट्राच्या पार्श्वभूमीवर आधारित एक प्रेमकथा आहे. या चित्रपटाची निर्मिती सुप्रसिद्ध चित्रकार शशिकांत धोत्रे ह्यांनी केली आहे तर कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन सुद्धा शशिकांत धोत्रे ह्यांनी केलं आहे. मराठी चित्रपटसृष्टीत प्रेम, भावना आणि संगीत यांचं अनोखं मिश्रण घेऊन येणारा हा नवा चित्रपट २३ मे २०२५ ला आपल्या जवळच्या सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे.

### केबीटी अभियांत्रिकीच्या दोनशे विद्यार्थ्यांना मिळाली नोकरी

**नाशिक ।** येथील मराठा विद्या प्रसारक समाज संचलीत, कर्मवीर बाबुराव गणपतराव ठाकरे अभियांत्रिकी महावियालायातर्फे आयोजीत प्लेसमेंट ड्राईव्हमधून दोनशेपेक्षा अधिक विद्यार्थांची बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये यशस्वी निवड करण्यात आली. महाविद्यालयातील आयटी, मेकॅनिकल, इंस्टुमेंटेशन अँड कंट्रोल, ई अँड टीसी, सिव्हिल आणि एमबीए यासह विविध शाखांसाठी नियमितपणे प्लेसमेंट ड्राईव्ह आयोजित केले जाते. त्यामध्ये सन २०२४-२५ साठी सहभागी होणाऱ्या कंपन्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. फोर्स मोटर्स, बॉश, कॉग्निझंट, रोबोयो ग्लोबल, इमर्सन, टेक महिंद्रा, अरेस सॉफ्टवेअर, विनजीत, जेएनके इंडिया, एल.टी.आय माइंडट्री, एच.एफ.एफ.सी, आय.सी.आय.सी.आय बँक आणि टोयो इंजिनीअरिंग या प्रमुख नामांकीत कंपन्या यावर्षी सहभागी होत्या. या यशस्वी विद्यार्थ्यांचे मविप्र समाज संस्थेचे सरचिटणीस अ‍ॅड. नितीन ठाकरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वास मोरे, चिटणीस दिलीप दळवी, उपसभापती देवराम मोगल, नाशिक शहर संचालक अ‍ॅड. लक्ष्मण लांडगे, आदींनी कौतुकास्पद कामगिरीसाठी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाप्रसंगी शिक्षणाधिकारी डॉ. डी. डी. लोखंडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश आर देवणे, उपप्राचार्य डॉ. एस.जे. कोकाटे, रजिस्ट्रार सृष्टी शिंदे, ट्रेनींग अँड प्लेसमेंट ऑफिसर महेश आडके व सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

# महाराष्ट्रातील अव्वल बँक म्हणून नामको बँक नावारूपास : आ. बनकर

**पिंपळगाव बसवंत ।** अत्यंत प्रतिकूल परिस्थिती व आर्थिक अडचण, शासनाच्या जाचक अटी, नियम यांचा सामना करत नामको बँकेने पुनश्च गरुड भरारी घेतली असून २९४ कोटींचे कर्ज राईट अप करून त्यातील १३७ कोटी रुपयांची वसुली केली आणि महाराष्ट्रातील अव्वल बँक म्हणून नामको बँक पुनश्च दिमाखात नावारूपास आली असल्याचे प्रशंसोद्गार निफाडचे आमदार दिलीपराव बनकर यांनी काढले.

येथील नामको शाखेचे नूतन वास्तूत स्थलांतर करण्यात आले. या स्थलांतर कार्यक्रमात आमदार बनकर बोलत होते. खासदार भास्करराव भगरे, नामको बँकेचे चेअरमन सोहनलाल भंडारी, अशोक शाह, वसंतराव गीते, भास्कर बनकर, दिलीपराव मोरे, विश्वासराव मोरे, तानाजी बनकर, सुरेश खोडे, रामभाऊ माळोदे, सतीश मोरे, बापूसाहेब पाटील, करसनदास ठक्कर, मनोज मुथा, रामराव डेरे आदी प्रमुख मान्यवर यावेळी उपस्थित होते. प्रारंभी नूतन वास्तूत विधिवत पूजन करून आ. बनकर यांच्या हस्ते नूतन वास्तू प्रवेश सोहळा संपन्न झाला. यावेळी आमदार बनकर म्हणाले की, नामको बँकेत पुनश्च ठेवींचा ओघ सुरू झाला असून बँक पूर्वपदावर आली आहे. नामको बँकेच्या राज्यात व राज्याबाहेर पण शाखा आहेत. सर्वांना बरोबर घेऊन व सर्वांना कर्जपुरवठा करणारी बँक म्हणून नामकोचा नाव लौकिक आहे. म्हणूनच नियमात काही बदल करून नामको बँकेने शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करावा यासाठी शासन पातळीवर लागणारी हवी ती मदत करण्यास आपण तयार असल्याचे स्पष्ट करून स्व. हुकुमचंद बागमार यांनी नामकोच्या प्रगतीसाठी मोठे योगदान दिले आहे. स्व हुकुमचंद बागमारांच्या संकल्पनेतून उभे राहिलेले कॅन्सर हॉस्पिटल म्हणजे नामको बँकेच्या सेवाभावी वृत्तीचे स्मारक असल्याचे आमदार बनकर यांनी स्पष्ट केले. नामकोचे चेअरमन सोहनलाल भंडारी यावेळी बोलताना म्हणाले की, नामको बँकेचे राज्यातील तेराशे गावात सभासद असून बँकेकडे पाचशे कोटी रुपयांचा स्वनिधी आहे. नामकोला बँकींग क्षेत्रातील विविध राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झालेले आहे. संपलेल्या आर्थिक वर्षात नामको बँकेला ६५ कोटी रुपये नफा झाला असून थकबाकीचे प्रमाण ३८ टक्क्यावरून सहा टक्क्यावर आले आहे. यासाठी संचालक मंडळाने १६ महिने अविरत परिश्रम घेत काम केले म्हणूनच नामको बँकेला गतवैभव प्राप्त करून देणे शक्य झाल्याचे भंडारी यांनी स्पष्ट केले. यावेळी खासदार भगरे, वसंतराव ते, भास्कर बनकर, सतीश मोरे, सुरेश खोडे आदींनी मनोगत व्यक्त करून नामको बँकेच्या प्रगतीची प्रशंसा केली. कार्यक्रमास बँकेचे उपाध्यक्ष सुभाष नहार, संचालक विजय साने, हेमंत धात्रक, सपना बागमार, महेंद्र बुरड, गणेश गिते, भानुदास चौधरी, नरेंद्र पवार, आकाश छाजेड, प्रकाश दायमा, हरीश लोढा, ललित मोदी, अविनाश गोठी, अशोक सोनजे, प्रफुल्ल संचेती, रंजन ठाकरे, देवेंद्र पटेल, शितल भट्टड, प्रशांत दिवे आदींसह सभासद ग्रामस्थ उपस्थित होते.



### सहकार क्षेत्रात नामको बँकेचा मोठा नावलौकिक

नामको बँकेने समाजातील गरीब व गरजू व्यावसायिकांना कर्जरूपी मदतीचा हात दिला आहे. नामको बँकेच्या कर्जपुरवठ्यामुळे अनेक छोट्या व्यावसायिकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. नामको बँकेच्या प्रगतीत स्व हुकुमचंद बागमार यांचे मोठे योगदान असून त्यांच्या विचारसरणीने बँकेचे कामकाज प्रगतीपथावर आहे. कॅन्सर हॉस्पिटलच्या माध्यमातून रुग्णांना मोठा आधार मिळाला असून कॅन्सर हॉस्पिटल नामको बँकेच्या सामाजिक बांधिलकीची ओळख ठरली आहे. राज्यातील सहकार क्षेत्रात नामको बँकेने मोठा नावलौकिक मिळविला आहे.

**- खा. भास्करराव भगरे, दिंडोरी**



## पहलगाम हल्ल्याचा व्ही.आय.पी इंडस्ट्रीजकडून तीव्र निषेध

**देवळाली कॅम्प ।** काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या अमानवीय अतिरेकी हल्ल्याचा व्ही. आय.पी इंडस्ट्रीज लिमिटेड व व्ही.आय.पी एम्पलॉईज युनियनने तीव्र निषेध केला असून, या हल्ल्यात बळी गेलेल्या निष्पाप भारतीय नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या दुःखद प्रसंगी मृतांच्या कुटुंबीयांप्रती आणि जखमी झालेल्या नागरिकांप्रती सहवेदना व्यक्त करत या दुःखातून सावरण्यासाठी ईश्वर त्यांना शक्ती देवो, अशी प्रार्थनाही करण्यात आली. श्रद्धांजली सभेस व्ही.आय.पी समूहाचे कार्यकारी संचालक आशिष कुमार साहा, जनरल मॅनेजर- एच.आर. आणि आय. आर. सोपान गोडसे, व्ही.आय.पी एम्पलॉईज युनियनचे अध्यक्ष नरेंद्र कुमार तसेच अनेक वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी सर्व उपस्थितांनी सामूहिक मौन पाळून शहीदांना आदरांजली अर्पण केली.

## भिवंडी पॅटर्नच्या धर्तीवर प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी उभारलेले शेड नियमित करावे

### आ. हिरेंच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**सिडको ।** अंबड येथील शेतकऱ्यांच्या जमिनी शासनाने एमआयडीसीच्या उभारणीसाठी अनेकदा अधिग्रहित केलेल्या असल्याने येथील शेतकरी अल्पभूधारक झालेले आहेत. उपजिवीकेचे साधन म्हणून शेतकऱ्यांनी उभारलेले शेड शासनाने कुठलाही दंड न आकारता नियमित करावे यासाठी आमदार सिमा हिरे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांच्या एका शिष्टमंडळाने आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली.विविध प्रकल्पात जमिनी गेल्याले शेतकऱ्यांनी उपजिवीकेसाठी राहिलेल्या जमिनीवर उभारलेले शेड भिवंडी पॅटर्नच्या धरतीवर लवकरात लवकर नियमित करावे, अशी मागणी आ.हिरेंनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.



अंबड आणि परिसरातील शेतकऱ्यांच्या मोठया प्रमाणावर जमिनी शासनाने १९७५ साली एमआयडीसीसाठी नाममात्र दरात संपादित केलेल्या आहेत. परिणामी येथील शेतकरी अल्पभूधारक झालेले आहेत.एमआयडीसीतील रसायनयुक्त पाणी परिसरातील नदी, नाल्यांमध्ये तसेच पाझरून जामिनीच्या खोलवर गेल्याने त्याचा थेट परिणाम येथील शेतीवर होवून दिवसेवस येथील शेतकऱ्यांच्या शेती नापिक होत आहे. उपजिविकेचे साधन म्हणून शेतकऱ्यांनी आपल्या जमिनींवर लहान-मोठया पत्र्याच्या शेडची उभारणी केलेली आहे. शासनाने सदर शेड नियमित करावे अशी मागणी येथील शेतकऱ्यांची आहे.

आज आमदार हिरे यांनी शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळासह आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सह्याद्रीअतिथी गृहावर भेट घेतली. अल्पभूधारक शेतकऱ्यांनी जमिनीवर उभारलेल्या पत्र्याच्या शेडकडे कमर्शियल दृष्टीकोनातून न पाहता उपजिवेकेचे साधन म्हणून पाहणे अत्यंत गरजेचे असल्याचे यावेळी आ.हिरेंनी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले.शेड उभारणीवर दंडाची रक्कम न आकारता मालकी तत्वावर पूर्वीच्याच ४.५ रुपये प्रति चौरस मीटर कर आकारणी करून प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांसाठी विशेष बाब म्हणून सदरचे आहे त्याच स्थितीतील शेड नियमीत करावे अशी आग्रही मागणी शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने केली आहे. शिष्टमंडळात माजी नगरसेवक दिलीप दातीर, राकेश दोंदे, शरद फडोळ, रामदास दातीर, वामनराव दातीर, रामकृष्ण दातीर, रामदास गोविंद दातीर आदींचा समावेश होता.

## बीएपीएसतर्फे मेडिको स्पिरिच्युअल कॉन्फरन्स रविवारी

### समन्वयक डॉ.उमेश मराठे यांची माहिती; तज्ञ करणार मार्गदर्शन

**नाशिक ।** बीएपीएस नाशिकच्या वतीने मेडिको स्पिरिच्युअल कॉन्फरन्स आयोजित केली आहे. येत्या रविवारी (२७ एप्रिल) सकाळी ९ वाजेपासून पंचवटीतील स्वामी नारायण मंदिर येथे ही परीषद होणार आहे. परीषदेचे समन्वयक म्हणून आर्ट ऑफ लिव्हिंगचे अ‍ॅपेक्स मेंबर तथा प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ व वंधत्व निवारण तज्ञ डॉ.उमेश मराठे हे या परीषदेसाठी समन्वयक आहेत. परीषदेत तज्ञ व्यक्ती सहभागी डॉक्टरांशी विविध विषयांवर संवाद साधणार आहेत.

नुकताच आर्ट ऑफ लिव्हिंग, बेंगलोरचे अपेक्स मेंबर म्हणून डॉ.उमेश मराठे यांची निवड झाली. आपला वैद्यकीय व्यवसाय सांभाळताना डॉक्टर वर्गासाठी त्यांनी अनोख्या उपक्रमाच्या आयोजनासाठी पुढाकार घेतला आहे. 'थिंक डिफ्रंट, बी डिफ्रंट' अशी या परीषदेची संकल्पना असल्याची माहिती समन्वयक डॉ.उमेश मराठे यांनी दिली आहे. अधिक माहिती देताना डॉ.उमेश मराठे म्हणाले, की या परीषदेत 'थिंक डिफ्रंट, बी डिफ्रंट' या विषयावर मोटिव्हेशल स्पिकर व स्पिरिच्युअल स्कॉलर पुज्य अपूर्वमुनी स्वामी मार्गदर्शन करणार आहेत. 'डॉक्टरांचे आयुष्य' या विषयावर हृदयविकार तज्ज्ञ आणि इलेक्ट्रोफिजिओलॉजिस्ट तसेच आर्ट ऑफ लिव्हिंग, पुणे येथील ट्रेनर डॉ.राजेश धोपेशवारकर यांचे सत्र पार पडणार आहे. या परीषदेत सकाळी ९ वाजता सहभागींचे स्वागत केले जाईल. यानंतर मंदिर दर्शन व अभिषेक सोहळा होईल. व नाष्टा झाल्यानंतर सत्रांना सुरुवात होणार आहे. सकाळी १० ते दुपारी १.३० वाजेपर्यंत हे सत्र पार पडणार आहेत.



यासोबत डॉक्टरांच्या पाल्यांसाठी स्वतंत्र असे सत्र मंदिराच्या परीसरात पार पडणार आहे. या सत्रामध्ये मुलांना त्यांच्या आयुष्यात प्रभावी कामगिरी करण्यासाठी प्रोत्साहित केले जाणार आहे. या परीषदेत सहभागी होण्यासाठी श्री. दिपक देशमुख ९३७३५८०५९४ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन समन्वयक डॉ. उमेश मराठे यांनी केले आहे.

अधिकाधिक डॉक्टरांनी या परीषदेत सहभागी होऊन निरागस जीवनाचा मंत्र जाणून घ्यावा, असे आवाहन परमुख स्वामी महाराज, समन्वयक डॉ.उमेश मराठेयांनी केले आहे.

# दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ वावीत कॅण्डल मार्च

(राम सुरसे यांजकडून)

**वावी ।** काश्मीरमधील पेहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ वावीत कॅण्डल मार्च मोर्चा काढून दहशतवादी हल्ल्याचा निषेध करण्यात आला. दि. २२ एप्रिल रोजी काश्मीरच्या पहेलगाम येथील बैसरण येथे दुपारी तीन वाजेच्या सुमारास पाकिस्तानी दहशतवाद्यांनी पर्यटकांना गोळ्या घालून जिवे मारण्याची घटना घडली त्यात जवळपास २८ निष्पाप पर्यटकांचा बळी गेला आहे तर वीस जण जखमी झाले. पेहलगाम हे स्मॉल स्विझर्लंड म्हणून ओळखले जाते त्यामुळे दरवर्षी पर्यटकांची गर्दी भरपूर प्रमाणात असते याचा फायदा घेत या दहशतवाद्यांनी भारतीय पर्यटकांना त्यांचा धर्म विचारून त्यांच्यावर गोळीबार केला.






याच घटनेचा निषेध म्हणून सिन्नर तालुक्यातील वावी येथील ग्रामस्थांनी पाकिस्तानी हल्लेखोरांचा छत्रपती शिवाजी महाराज चौकात एकत्र येत मेणबत्ती पेटवून दहशतवाद्यांचा निषेध केला. दरम्यान यावेळी ग्रामस्थांनी शिवाजी चौक ते बस स्थानक तसेच अहिल्यादेवी चौक मार्गे बाजारतळ असा कॅन्डल मार्च मोर्चा काढत पुनश्च शिवाजी महाराज चौकात शोकसभा घेण्यात आली.

याप्रसंगी कारभारी वेलजाळी सर, सर्जेराव वाजे, वावीचे सरपंच विजय काटे, विघ्नहर्ता प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश वेलजाळी, पत्रकार संतोष भोपी, भाजपचे शिवाजी वेलजाळी, डॉक्टर वैभव केसकर आदींनी श्रद्धांजलीपर मनोगत व्यक्त करत वंदे मातरमने घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. प्रसंगी मोर्च्यात वावी येथील बहुसंख्य हिंदू बांधव सहभागी झालेले होते.

